## कोड्यात टाकणारे वर्तुळ



कागदावरून पेन्सिल न उचलता तुम्हाला एखादे वर्तुळ आणि त्याचा केंद्रबिंदू काढता येईल का? हे अशक्य आहे असेच वाटते, पण तसे करणे शक्य आहे.

चित्रात दाखवल्याप्रमाणे कागदाच्या उजव्या कोपऱ्याची घडी करा. घडीच्या कोपऱ्याला केंद्रबिंदू मानून वर्तुळ पूर्ण करा.

## बेरीज शंभर




येथे 1 ते 9 हे आकडे अशा तऱ्हेने मांडले आहेत, की त्यांची बेरीज बरोबर शंभर होते. हेच आणखी एखाद्या प्रकारे करता येईल का? ही मांडणी करताना कोणत्या नियमाचा वापर करण्यात आला आहे ?

### मोजणार कसे ?

तुमच्याकडे 4 लिटर आणि 7 लिटर अशी दोनच मापे आणि बादलीभर दूध आहे. गिऱ्हाइकाला दोन लिटर दूध कसे देणार?




### फेब्रुवारीत किती दिवस असतात?

